## प्रेस नोट दिनांक ०६/०२/२०२४

**जोडभावी पेठ पोलीस ठाणे गु.र.नं. ३४०/२०२२ भादविस कलम ३६३ या गुन्ह्यातील आरोपी व पिडीत बालिका यांचा कसोशिने शोध घेवून आरोपीस अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षा कडून ताब्यात घेतले.**

जोडभावी पेठ पोलीस ठाणे गु.र.नं.३४०/२०२२ भादविस कलम ३६३ प्रमाणे दिनांक २१/०६/२०२२ गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यातील अल्पवयीन बालिकेस संशयीत आरोपी नामे कुणाल भिमराव सावंत याने कशाचेतरी अमिष दाखवून पळवून नेले असले बाबतचा गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील बालिका व आरोपी यांचा जोडभावी पेठ पोलीस ठाणे कडील तपासीक अमलदार यांनी तपास करून देखील ते मिळुन न आल्याने सदरचा गुन्हा हा दि. ०१/०८/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षा कडे तपास कामी वर्ग करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील बालिका व आरोपी यांचा अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाने कसोशिने तपास करून गुप्त बातमी दारा मार्फत माहिती काढून आरोपी नामे कुणाल भिमराव सावंत यास बुधवार पेठ सोलापूर येथून शिताफीने शोध घेवून त्यांना दि.०५/०२/२०२४ रोजी ताब्यात घेवून जोडभावी पेठ पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस आयुक्त एम.राजकुमार पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) श्रीमती डॉ.दिपाली काळे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्रीमती प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षा कडील पोनि/महादेव राऊत पोह/८४६ महादेव बंडगर मपोशि/१४३९ तृप्ती मंडलिक मपोशि/१५९१ रमादेवी भुजबळ मपोशि/१७८८ उषा मळगे मपोशि/९११ सीमा खोगरे यांनी उत्कृष्ट कामगीरी करून सदर आरोपीचा शोध घेतला.

(प्रांजली सोनवणे)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
सोलापूर शहर

Scanned with CamScanner